# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

# Savitribai Phule Pune University
(Formerly University of Pune)

**छाननी व तालिनीकरण कक्ष**
गणेशखिंड, पुणे ४११ ००७
दूरध्वनी क्र: ०२०.२५६२१४००
website: www.unipune.ac.in

**Scrutiny & Tabulation Section**
Ganeshkhind, Pune -411 007.
Phone: 020-25621400
**e-mail:** dyrst@pun.unipune.ac.in
st-science@pun.unipune.ac.in


**संदर्भ.क्रमांक — परीक्षा/छावता/२४३** **दिनांक :— १८/०२/२०२६.**

**प्रति,**
**मा. प्राचार्य,**
**सर्व संलग्नित महाविद्यालये,**
**पुणे, अहिल्यानगर, नाशिक.**

**विषय: मूल्यमापन प्रक्रियेस प्राधान्य देणेबाबत...**

**संदर्भ: परीक्षा/समन्वय/३७ दि.२०.०१.२०२६**

महोदय,

आपणास विदित आहेच की, हिवाळी सत्र २०२५ च्या विविध विद्याशाखांच्या, विविध अभ्यासक्रमांच्या (पदवी व पदव्युत्तर) उत्तर पत्रिकांचे मूल्यमापन विभागवार सुरु आहे. पैकी काही परीक्षांच्या काही विषयांच्या उत्तरपत्रिकांचे मूल्यमापन होणे बाकी असल्याने (कला, विज्ञान, वाणिज्य, औषध निर्माणशास्त्र, इ. विद्याशाखांमधील) बऱ्याच अभ्यासक्रमांचे निकाल घोषित करण्यास विलंब होत आहे. पैकी सदर अभ्यासक्रमाचे विद्यार्थी हे आपल्या महाविद्यालयातीलदेखील असतील.

आपल्या महाविद्यालयातील मान्यताप्राप्त प्राध्यापकांना जवळील मूल्यमापन केंद्रावर पाठवून मूल्यमापनाची प्रक्रिया करण्यास गतिमान करण्यास सहकार्य करावे (एखाद्या शिक्षकाचा पाल्य किंवा नातेवाईक परीक्षेला बसला असेल तर त्या वर्षाच्या परीक्षेव्यतिरिक्त इतर वर्षाच्या परीक्षेच्या उत्तरपत्रीकांचे मूल्यमापन करण्यास संबंधित शिक्षक पात्र असेल).

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ च्या कलम ८९ द्वारे परीक्षांचे निकाल परीक्षेच्या अखेरच्या दिवसांपासून ३० दिवसांचे आत जाहीर करण्याची तरतूद विहित करण्यात आलेली आहे. तसेच कलम ४८ (४) मध्ये विद्यापीठांच्या परीक्षाविषयक कामकाजाकरिता सहाय्य करण्याबाबत खालीलप्रमाणे तरतूद करण्यात आलेली आहे. याबाबत वरील संदर्भीय पत्रान्वये यापूर्वीच आपणास सूचित करण्यात आले आहे (सोबत प्रत).

कृपया याबाबत सर्व महाविद्यालयांचे प्राचार्य यांना कळविण्यात येते की, केंद्रीय मूल्यमापन केंद्राच्या कामकाजाकरिता नियुक्त शिक्षकांचे नियुक्ती आदेश प्राप्त होताच संबंधित शिक्षकांना नमूद कालावधीकरिता तात्काळ कार्यमुक्त करून विनाविलंब कॅप सेंटरवर हजर राहण्याबात आदेशित करावे. अन्यथा आपल्या महाविद्यालयातील पर्यायाने विद्यापीठाच्या अभ्यासक्रमांचा निकाल हा वेळेवर घोषित करणे सोयीचे जाईल.

कळावे,

आपला,

**(डॉ. प्रभाकर देसाई)**
**प्रभारी संचालक,**
**परीक्षा व मूल्यमापन मंडळ**

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

**SAVITRIBAI PHULE PUNE UNIVERSITY**

(Formerly University of Pune)

**परीक्षा समन्वय कक्ष**
परीक्षा विभाग, गणेशखिंड,
पुणे ४११ ००७.
दूरध्वनी क्र.: ०२०-२५६२१४४०
ई-मेल आयडी:
ar.coordination@pun.unipune.ac.in
coe@unipune.ac.in
संकेतस्थळ :www.unipune.ac.in

**Exam Co-ordination Section**
Examination Department,
Ganeshkhind, Pune 411 007.
Phone No.: 020-25621440
E-mail Id.:
ar.coordination@pun.unipune.ac.in
coe@unipune.ac.in
Website: www.unipune.ac.in


**संदर्भ क्र. परीक्षा/समन्वय/३७** **<u>अत्यंत तातडीचे/महत्त्वाचे</u>** **दिनांक २०.०१.२०२६**

प्रति,
मा.प्राचार्य/मा.संचालक
सर्व संबंधित संलग्नित महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्था
पुणे जिल्हा, अहिल्यानगर जिल्हा, नाशिक जिल्हा व दादरा आणि नगर हवेली केंद्रशासित प्रदेश

**विषय : केंद्रीय मूल्यमापन प्रकल्पाअंतर्गत मुल्यांकनाच्या कामकाजाकरिता शिक्षकांना कार्यमुक्त करणेबाबत.**

महोदय/महोदया,

वरील विषयाच्या अनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, हिवाळी सत्र परीक्षा २०२५ च्या केंद्रीय मूल्यमापन प्रकल्पाअंतर्गत मुल्यांकनाच्या कामकाजाकरिता नियुक्त केलेले शिक्षक संबंधित कॅप सेंटरवर कामकाजाकरिता हजर होत नसल्याचे निदर्शनास आलेले आहे. महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ च्या कलम ८९ द्वारे परीक्षांचे निकाल परीक्षेच्या अखेरच्या दिनांकापासून ३० दिवसांच्या आत जाहीर करण्याची तरतूद विहित करण्यात आलेली आहे. तसेच कलम ४८(४) मध्ये परीक्षेच्या कामकाजाकरिता सहाय्य करण्याबाबत खालीलप्रमाणे तरतूद करण्यात आलेली आहे.

***"विद्यापीठ, संलग्न, संचालित महाविद्यालये, समूह महाविद्यालये किंवा मान्यताप्राप्त परिसंस्था यांच्या प्रत्येक अध्यापकावर आणि अध्यापकेतर कर्मचाऱ्यावर, विद्यापीठाच्या परीक्षा व विद्यार्थ्यांचे मूल्यमापन यांबाबत परिनियमाद्वारे विहित केल्याप्रमाणे आवश्यक ते सहाय्य आणि सेवा देणे बंधनकारक आहे. याबाबत विद्यापीठाच्या किंवा महाविद्यालयाच्या किंवा परिसंस्थेच्या आदेशाचे अनुपालन करण्यात कोणत्याही अध्यापकाने किंवा अध्यापकेतर कर्मचाऱ्याने कसूर केल्यास, ती गैरवर्तणूक असल्याचे समजण्यात येईल आणि तो कर्मचारी शिस्तभंगविषयक कारवाईसाठी पात्र असेल."***

तरी याबाबत सर्व महाविद्यालयांचे/परिसंस्थांचे प्राचार्य/संचालक यांना कळविण्यात येते की, केंद्रीय मूल्यमापन केंद्राच्या कामकाजाकरिता नियुक्त शिक्षकांचे नियुक्ती आदेश प्राप्त होताच संबंधित शिक्षकांना नमूद कालावधीकरिता तात्काळ कार्यमुक्त करुन विनाविलंब कॅप सेंटरवर हजर राहण्याबाबत आदेशित करावे. कोणत्याही महाविद्यालयाने अशा नियुक्तीत परस्पर बदल अथवा संबंधित शिक्षकांना कार्यमुक्त न केल्यास प्रमादअंतर्गत सर्व संबंधितांवर कारवाई करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

कळावे,

आपला,

(प्रा.डॉ.प्रभाकर देसाई)
**प्रभारी संचालक**
**परीक्षा व मूल्यमापन मंडळ**

**प्रत माहिती व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी:**

**१) मा.संचालक, सर्व संबंधित विद्याशाखानिहाय केंद्रीय मूल्यमापन प्रकल्प केंद्र, हिवाळी सत्र परीक्षा २०२५.**

- आपणांस विनंती की, केंद्रीय मूल्यमापन प्रकल्प केंद्राचे मुल्यांकनाचे कामकाज करण्यास नकार दिलेल्या व सदर कामकाजाकरिता हजर न झालेल्या शिक्षकांची माहिती नियुक्ती आदेशासह उपकुलसचिव, प्रमाणपत्र कक्ष, परीक्षा विभाग यांना प्रमाद समितीअंतर्गत पुढील प्रशासकीय कार्यवाही करण्यासाठी पाठविण्यात यावी.

**२) उपकुलसचिव, छाननी व तालिनीकरण कक्ष, परीक्षा विभाग.**